# ।। बिन निर्णा को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग


महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

## प्रस्तावना

परापरीपासून दोन मुख्य लोक आहेत.





आम्ही आधीपासून होणकाळ पारब्रम्हच्या लोकात राहतो. होणकाळ पारब्रम्हमध्ये ३५ लोक आहेत.या सर्व ३५ लोकांमध्ये काळाचे दु:ख आहे.भक्ती केल्याने काळापासून मुक्त होतात आणि महासुखात जातात असे सर्व ज्ञानी,ध्यानी,जगाच्या स्त्री, पुरुषांना ज्ञानाने समजवितात जगाचे स्त्री,पुरुषही इतकेच समजतात की भक्ती केल्याने काळापासून मुक्त होतो म्हणजे मोक्ष होतो.जगाचे होणकाळी ज्ञानी,ध्यानीही,हे नाही जाणत की,होणकाळाच्या कोणत्याही लोकाची भक्ती सदाकरिता काळापासून मुक्त करवित नाही तसेच सदाकरिता महासुखात पाठवत नाही.हा भेद सतस्वरुपी संताला असतो की होणकाळाची प्रत्येक भक्ती काळाच्या मुखात ठेवते आणि फक्त सतस्वरुपाची भक्ती काळाच्या मुखातून पार करवते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज हे सतस्वरुपी संत आहेत.हा फरक त्यांना समजत होता म्हणून भक्ती निर्णया विना म्हणजे ज्ञान समज विना केल्याने हंस मोक्षाच्या लोकास कसा जात नाही हे समजविण्याकरिता हा बिन निर्णयाचा अंग लिहिला आहे.

### ।। अथ बिन निर्णा को अंग लिखंते ।।

।। कुंडल्या ।।

**बिन निर्णो सुणीया बिना ।। भक्त करे जुग माय ।।**<br>
**से नर जुगमे ओतरे ।। लोक किणी नही जाय ।।**<br>
**लोक किणी नही जाय ।। मोहो घर को घर माही ।।**<br>
**अंतकाळ मे जीव ।। छाड कुणा दिस जाही ।।**<br>
**सुखराम एक नही पहुचीयो ।। ना अब पोहचे जाय ।।**<br>
**बिन निर्णो सुणीयां बिना ।। भक्त करे जुग आय ।।१।।**

होणकाळाच्या पलीकडच्या सतस्वरुपाला पोहचण्याचा भेद ऐकल्याशिवाय होणकाळाच्या भक्त्याच सतस्वरुपात पोहचवितात ही समज बनवून होणकाळाच्या





देशात पोहचविणारी भक्ती किंवा भक्त्या केल्याने भक्त होणकाळाच्या पलीकडच्या सतस्वरुपात पोहचत नाही.ते संत होणकाळाच्या लोकांमधील कोण्या एका लोकात अंतकाळ झाल्यानंतर म्हणजे शरीर सुटल्यानंतर धारण करतो.जसे कोणी मनुष्य देश सोडून परदेशी जाणे चाहतो परंतु परदेशाचा रस्ता माहित नाही आणि देशाच्याच रस्त्यांनी अती कष्ट भोगतच चालत राहतो तर तो मनुष्य घर सोडल्या


 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

नंतरही परदेशास पोहचत नाही उलट थकून जातो आणि घरातच मोह असल्या कारणाने थकून परदेशास न पोहचता परत घरी येतो.अशाप्रकारे अंत समयी प्रत्येक हंस शरीर सोड्तो परंतु शरीर सोड्ल्यानंतर हंसाने मनुष्य देहात सतस्वरुपाची दिशा धारण न केल्या कारणाने ज्या लोकात आधीपासून होता अशा होणकाळाच्याच लोकां मध्ये अवतरतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,स्त्री,पुरुषांना सांगतात की,होणकाळाची भक्ती केल्याने आजपर्यंत सतस्वरुपाच्या लोकात एकही मनुष्य पोहचला नाही आणि पुढेही एकही मनुष्य पोहचणार नाही. ।।१।।

**भिन्न भिन्न कर निर्णो सुणे ।। लोक लोक रो जोय ।।**
**रेणी रंग बिचार सुख ।। सब का मालम होय ।।**
**सबका मालम होय ।। तबे देहे के नर माँही ।।**
**जब पूगे किण लोक ।। ग्यान मे सुणीयो यांही ।।**
**सुखराम गेल वाही गहे ।। ज्यां उर नेछो होय ।।**
**भिन्न भिन्न कर निर्णो सुणे ।। लोक लोक रो जोय ।।२।।**




आधीपासून सतस्वरुप आणि होणकाळ असे दोन तसेच होणकाळातील जीवब्रम्ह आणि माया असे अधिक दोन लोक होते म्हणजे आधीपासून सर्व चार लोक आहेत.आधी पासून हंस होणकाळात जीवब्रम्ह पदाचा वासी होता. होणकाळाने इच्छा मायेच्या सोबत भोग करुन साकारी सृष्टी बनविली. त्यात मृत्युलोक,पाताळ लोक,स्वर्गादिक लोक बनविले.स्वर्गादिकात स्वर्गाचा देवता लोक,स्वर्गात इंद्रपद,शक्तीचा लोक,विष्णूचा लोक,ब्रम्हाचा लोक,महेशचा लोक इ.





बनविले.स्वर्गाच्या सोबत नर्क बनविला. पाताळात नरकाचे दु:ख बनविले.जसे हे वेगवेगळे लोक बनले आहेत तसेच त्या लोकापासून वेगवेगळ्या भक्त्या निघाल्या.ज्या लोकापासून जी भक्ती निघाली त्या भक्तीची पोहच त्याच लोकापर्यंत राहते. त्या लोकाच्या पलीकडील किंवा त्या लोकाला सोडून दुसऱ्या लोकाची राहत नाही.भक्ती फक्त मनुष्य तनात संचित होते अन्य तनात कितीही भक्ती केली तरी भक्ती तर होऊ शकते परंतु रजमात्र ही संचित होत नाही म्हणजे भक्ती करणाऱ्याला भक्तीचे फळ लागत नाही.प्रत्येक हंस आदि पासून महासुख निरंतर चाहतो.आजपर्यंत ज्या देशात राहिलो तेथे महासुख मिळाले नाही उलट

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।


काळाचे महादु:ख पडले.काळाच्या महादु:खातून निघावे आणि महासुख मिळावे ही चाहणा प्रत्येक हंस करतो.प्रत्येक हंस हे समजतो की मोक्ष म्हणजे काळाच्या दु:खापासून सुटका आणि परमात्म्याच्या देशाची प्राप्ती.अशा महासुखाची प्राप्ती मी मनुष्य देहात भक्ती करेल तेव्हा होईल असे ज्ञानात ऐकल्या कारणाने विचार करतो म्हणून संसारा सोबत किंवा संसार त्यागून भक्ती करतो परंतु सर्व हर भक्तीच्या पोहचचा निर्णय ऐकल्या शिवाय करतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जितके लोक आहे तितक्याच भक्त्या आहेत.सर्व भक्त्या मोक्षात पोहचविणाऱ्या नाहीत. हे(आकृती)पाहून ज्ञानाचे समजू.

१) शक्तीची भक्ती–शक्तीच्या भक्तीची उपज शक्तीपासून आहे म्हणजे शक्तीच्या




लोकापासून झाली.शक्तीचा लोक आधीपासून काळाच्या मुखात आहे.जीव शक्तीची भक्ती मोक्षात पोहचविते ही समज करुन भक्ती करतो.शक्ती ही काळाच्या मुखात आहे तर काळापासून मुक्त होऊन जीव सतस्वरुपाच्या मोक्षपदाला कसा जाईल?याचा ज्ञानाने नाना प्रकाराने निर्णय करा.

असाच विष्णूचा वैकुंठ लोक आहे,महादेवाचा कैलास लोक आहे,ब्रम्हाचा सतलोक



आहे, इंद्राचे पद आहे,स्वर्गलोक आहे,पाताळलोक आहे.विष्णूच्या भक्तीची उपज वैकुंठापासून आहे.महादेवाच्या भक्तीची उपज कैलासापासून आहे.ब्रम्हाच्या भक्तीची उपज सतलोकापासून आहे. सत,जत,तपची उपज स्वर्गापासून आहे.१०१यज्ञाची उपज इंद्रापासून आहे.भैरुसारख्या राक्षसी देवताच्या भक्तीची उपज पाताळापासून आहे.क्षेत्रपाळाच्या भक्तिची उपज यमदुतापासुन आहे.जिथून ज्याची उपज आहे ती भक्ती त्याच लोकाला पोहचविल.त्या लोकाच्या पलीकडील लोकास पोहचविणार नाही.विष्णूची भक्ती भक्ताला वैकुंठास पोहचविल,तेथील सुख देईल.शंकराची भक्ती संताला कैलासास पोहचविल,तेथील सुख देईल.ब्रम्हाची भक्ती साधूला सतलोकास पोहचविल,तेथील सुख देईल,सत, जत,तप,साधणाऱ्या भक्ताला स्वर्ग मिळेल आणि स्वर्गाचे सुख मिळेल.१०१यज्ञ करणाऱ्याला इंद्रपद मिळेल आणि ३३ कोटी देवतांचा राजा बनण्याचे सुख मिळेल परंतु या कोणालाही सतस्वरुपाचे मोक्षपद मिळणार नाही.याचे कारण विष्णू,शंकर, ब्रम्हा, स्वर्ग,इंद्रपद या सर्वांच्या भक्त्यांची पोहच खालपर्यंत म्हणजे आकाशापर्यंत आहे, साकारापर्यंत आहे.साकार पदाच्या पलीकडे निराकाराचे १३पद आहेत.त्याच्या पलीकडे मोक्षाचे सतस्वरुप पद आहे.भैरुची भक्ती पाताळात पोहचविते.त्यात आधीपासूनच दु:ख आहे.तेथे आधी पासूनच काही सुख आहेच नाही.असेच क्षेत्रपाळाची भक्ती,

यमदूत बवविते.यमदूतांना रात्रंदिवस दुःख आहे.अशा काळाच्या महादुःखात भक्ती करुन अटकलेले जीव महासुखाच्या मोक्षपदाचे महासुख कसे मिळवतील?अशा अनेक भक्त्या आहेत याचा नाना प्रकाराने निर्णय करा.जशा साकारी भक्त्या आहेत तशा निराकाराच्या जीवपदाची आणि होणकाळ पारब्रम्हची दोन भक्ती आहेत.दोन्ही भक्त्यां मध्ये सुख दुःख नाही.हंसाला आधीपासून सुख पाहिजे ते या भक्त्यांपासून मिळत नाही आणि जीव आधी पासून गर्भाचे तसेच काळाचे दुःख चाहत नाही ते या भक्त्यां पासून मिटत नाही मग सतस्वरुपाच्या मोक्षात जाईल हे समजून या सर्व भक्त्या करतो आणि भारी धोका खातो.या सर्व साकारी आणि निराकारी भक्तीहून वेगळी आणि या साकारी आणि निराकारी सर्व पदांहून वेगळी सतस्वरुपाची भक्ती आहे.त्या भक्तीची उपज सतस्वरुप पद आहे.सतस्वरुपाचे पद महासुखाचे आहे.तेथे काळाचे दुःख लेशमात्रही नाहीत.अशा सर्व भक्त्यांच्या पोहचचा वेगवेगळा निर्णय ऐकाल आणि वेगवेगळ्या भक्तीपासून प्राप्त करणाऱ्या लोकांमधील सुख दुःख ज्ञानाने समजाल तर सुख दुःखाच्या पलीकडच्या महासुखाच्या भक्तीचा निर्णय होईल.अशा तऱ्हे तऱ्हेने भक्तीच्या पोहचचा आणि सुख दुःखाच्या निर्णय झाल्यावर हंस महासुखाच्या भक्तीच्या रस्त्याचा शोध करेल आणि धारण करेल.तो अन्य भक्तीत थोडासाही अटकणार नाही आणि सर्व भक्त्यांच्या पोहचचे ज्ञान समजल्या कारणाने हृदयात निश्चय करुन मोक्षाची भक्ती धारण करेल आणि मोक्षाच्या लोकात पोहचेल तो हंस चुकूनही काळाच्या दुःख देणाऱ्या लोकात अटकणार नाही.याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना जतवून राहिलेत की तऱ्हे तऱ्हेने भक्तीचे सुख–दुःख समजा मग भक्ती करण्याचा निर्णय करा.त्याच्याने काळात अटकवणारी भक्ती सुटुन जाईल व काळापासुन मुक्त करणारी भक्ति पकडली जाईल. ।।२।।

सर्ब लोक की रीत सुण ।। निजमन निसर जाय ।।
ज्युँ ऊलटी कुं प्रहरे ।। युं त्यागे मन मांय ।।
युं त्यागे मन मांय ।। मोख प्यारी जब लागे ।।
ज्युं बाळक मां हेत ।। काम कामी सिर जागे ।।
सुखराम ग्यान प्रकाशीया ।। केवळ ऊपजे आय ।।
सर्ब लोक की रीत सुण ।। निजमन निसर जाय ।।३।।

आजपर्यंत जी भक्ती केली त्यात मायेचे सुख दिसते तसेच मोक्ष दिसतो म्हणून त्याच्याशी निजमन जुडून जाते.या कारणाने त्या हंसाला काळाच्या पलीकडे मोक्ष आहे त्याच्याशी प्रिती राहत नाही परंतु जसे कोण्या मनुष्याने तऱ्हे तऱ्हेच्या वस्तू खाल्या आणि त्या वस्तूच्या बरोबरीच्या कोण्या विषारी वस्तूच्या कारणाने त्याला उलटी

झाली.त्याला उलटी झाल्यावर आवडणाऱ्या वस्तूपासून त्याचे मन उठून जाते. अशाप्रकारे मोक्ष सोडून अन्य भक्त्यांच्या सुखाशी प्रिती होऊन जाते परंतु त्यात भारी काळाचे दु:ख आहे.हे ऐकल्यावर जसे उलटी झाल्यावर त्या पदार्थांपासून मन उठून जाते तसे त्या भक्त्यांपासून निजमन उठून जाते आणि बालकाला जशी आई प्रिय वाटते तसेच कामीला काम म्हणजे स्त्री प्रिय वाटते तसे हंसाला राम म्हणजे सतगुरु प्रिय वाटतो म्हणजेच त्या हंसाच्या निजमनाला मोक्षाची भक्ती प्रिय वाटते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात असा सर्व भक्त्यांचे पोहचचे ज्ञान समजल्यावरच हंसाला सतस्वरुप ज्ञानाशी प्रिती होते आणि हंसात सतस्वरुपाच्या ज्ञानाचा प्रकाश होतो आणि हंसाच्या घटात सतस्वरुप केवळ उपजतो परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हंसात हा केवळ तेव्हाच उपजतो जेव्हा हंस सर्व भक्त्यांचा पोहचचा निर्णय करतो आणि त्या भक्त्यांमधील आपले निजमन काढून मोक्षाच्या भक्तीत लावतो.।।३।।


**बिन निर्णो सुणियां बिना ।। परममोख नही जाय ।।**
**क्रणी साजी छेहे बिन ।। गरज सरे नही काय ।।**
**गरज सरे नही काय ।। अरथ जांको ओ होई ।।**
**बिन सुणीयां किण गांव ।। कुण बिध पुंथे कोई ।।**
**चालणरी सरधा घणी ।। पण फिर फिर गोता खाय ।।**
**बिन निर्णो सुणीयां बिना ।। प्रममोख नही जाय ।।४।।**

सर्व भक्त्यांची पोहच ऐकल्याशिवाय परममोक्षाची भक्ती वेगळी आहे,हा निर्णय होत नाही ज्या कारणाने हंस परममोक्षास पोहचत नाही.हंस अन्य भक्त्यांच्या सर्व करण्या करण्यांचा अंत येत नाही असे शरीर सुटेल तोपर्यंत करतो परंतु याच्याने परमामोक्षात जाण्याची गरज सरत नाही.यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जगाचा दाखला देऊन समजविले. मुंबई भारी विस्ताराने बनलेले शहर आहे.तेथे कोणाच्या फ्लॅटवर पोहचायचे आहे परंतु त्या फ्लॅटचा पत्ता माहित नाही,फ्लॅटचे उपनगर माहित नाही तर तो मनुष्य कोणत्या विधीने इतक्या मोठ्या मुंबई शहरात जायचे असल्यावरही घरी कसा पोहचेल?त्या व्यक्तीची चालण्याची क्षमता खूप आहे परंतु कितीही घर शोधण्याचा प्रयत्न केला तरीही तो मनुष्य आयुष्यभर गोते खाईल.या उपनगराहून त्या उपनगरीत फिरेल परंतु त्याला आवश्यक घर नाही मिळणार.अशाप्रकारे मोक्षाची भक्ती सोडून करण्यांची भक्ती करण्याची कितीही क्षमता राहिली आणि करण्यांचा अंत येत नाही तितक्या करण्याही साधल्या तरीही परममोक्ष मिळणार नाही. ।।४।।

**बिन निर्णे भक्ति करे ।। सो नर नारी बे काम ।।**

भड भेटा खाता फिरे ।। किणियन पुंथे धाम ।।
किणीयन पुंथे धाम ।। पंथ पकड़यां बिन कोई ।।
या क्रता रीत ।। मत्त जेसो हर होई ।।
सुखराम नांव कारण नही ।। सुध व्हे आतम राम ।।
बिन निर्णे भक्ति करे ।। सो नर नारी बेकाम ।।५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात,ज्ञानाने निर्णय करुन सतस्वरुपाची भक्ती




पकडली नाही आणि जी होणकाळात भक्ती होती त्याच्यातून कोणती एक भक्ती किंवा अनेक भक्त्या धारण करुन घेतल्या असे सर्व स्त्री,पुरुष बेकाम आहे म्हणजे मोक्ष मिळविण्याकरीता अयोग्य आहे.जसे कोणी मनुष्य मुंबई शहरात व्याह्याच्या घरी पोहचण्यासाठी निघतो परंतु घराचा रस्ता पकडत नाही तो भडभेटा म्हणजे विसराळूसारखे पूर्ण मुंबई शहरात फिरत राहतो परंतु व्याह्याच्या घरी पोहचत नाही,असेच सतस्वरुपाची भक्ती सोडून अन्य भक्तीने होणकाळात फिरत राहतो मोक्षाच्या धामास पोहचत नाही.मुंबई शहरासारखी कर्त्याची कर्त्याच्या देशात म्हणजे सतस्वरुपाच्या देशातही हिच रीत आहे. कर्त्याच्या देशात अन्य भक्त्यांसारखी निजनामाची भक्ती आहे परंतु भक्त सर्व भक्त्यांचे निर्णय न समजता ज्या भक्तिची त्याची चाहणा राहते तिला तो धारण करुन घेतो.यात निजनाम आणि अन्य मायेच्या भक्तीच्या पराक्रमाचे कोणते कारण नाही आहे.जीवात्म्याला समज राहते तसा तो करतो.याप्रकारे आपले मनुष्य तन होणकाळच्या भक्त्यांमध्ये लावून व्यर्थ गमवून देतो. ।।५।।

मुलक रीत जाणे नही ।। ना सुख सुण्या न कोय ।।
दिसा नाव की गम नही ।। को किम पोंचे कोय ।।
को किम पुंचे कोय ।। धन बळ हे घर माही ।।
युं क्रणी बिना गिनान ।। रेत सब हद के माही ।।
सुखराम धन बुध हीण के ।। किम सुख लेवे जोय ।।
मुलक रीत जाणे नही ।। ना सुख सुण्या न कोय ।।६।।

ज्या देशात जायचे आहे त्या देशाची रीत,दिशा,नाम,तेथील सुख माहित नाही आणि चालण्याचा शरीरात उत्साह आणि बळ खूप आहे म्हणून चालत राहतो तरीही तो ज्या देशात जायचे आहे त्या देशात पोहचत नाही.या तऱ्हेने सतस्वरुप विज्ञानाची रीत सोडून उत्साह आणि बळाने अनंत करण्या साधतो तरीही हद म्हणजे होणकाळातच राहतो. होणकाळाच्या पलीकडे सतस्वरुपात जात नाही.जसे बुध्दीहीनच्या जवळ धन

खूप आहे परंतु धनाने कसे सुख घ्यायचे हे माहित नाही या कारणाने बुध्दीहीन धन भरपूर राहिल्या नंतरही सुखहिन राहतो.अशाप्रकारे शरीरात उत्साह आणि बळ भरपूर असल्यानंतरही तसेच निजनामाची भक्ती जगामध्ये उपलब्ध असल्यावरही हंस अमरलोकास जात नाही. ।।६।।

**धन अपार अंग सूर्वो ।। रीत न जाणे कोय ।।**
**युं क्रणी कर भेद बिन ।। जाय न सके जोय ।।**
**जाय न सक्के जोय ।। रीत कुळकी सब कीवी ।।**
**ज्यां लग सुणी जुग माय ।। त्यां लग साजर लीवी ।।**
**सुखराम लोक की गम नही ।। मुक्त कोण बिध होय ।।**
**धन अपार अंग सूर्वो ।। रीत न जाणे कोय ।।७।।**

धन अपार आहे,स्वभाव शुरवीर आहे.या कारणाने करण्याही खूप करतो परंतु मोक्षाचा भेद नसल्याकारणाने मोक्षाच्या धामास जाऊ शकत नाही.जी जी कुळाची म्हणजे माया ब्रम्हची रीत ऐकली त्या सर्व साधना साधल्या परंतु ही कुळाची रीत सतगुरुच्या देशास जात नाही या कारणाने भक्त शुरवीरही राहिला तरीही काळापासून मुक्त होऊन मोक्ष पदास जात नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जतवून राहिलेत. ।।७।।

**प्रममोख जाणो करे ।। गेल मोख की नाय ।।**
**तो नही पुंते हट करे ।। मोहो तज बन मे जाय ।।**
**मोहो तज बन मे जाय ।। गेल पावे नर कोई ।।**
**युं नही पुंचे जाय ।। लोक की प्रख न होई ।।**
**सुखराम प्रख बिन अड़ रहे ।। कुळ गांवड़ीया माय ।।**
**हर गेल बिना पूंचे नही ।। तसती करके जाय ।।८।।**

परममोक्षास जाणे चाहतो आणि रस्ता मोक्षाचा पकडत नाही.रस्ता मायावी करण्यांचा धरतो आणि मोक्ष मिळविण्याकरिता मायावी करण्यांची जिद्दीने साधना करतो. येथपर्यंत की कुटूंब परीवार,पत्नी,मुलगा,मुलगी,धन,राज्य या सर्वांतून मोह काढून टाकतो आणि जेथे अनेक दुःख पडतात अशा वनात कठोरतेने साधना साधतो परंतु मोक्षाचा रस्ता न मिळाल्या कारणाने इतके सर्व केल्यावरही मोक्ष नाही मिळू शकत. आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जगाच्या दाखला देऊन सांगितले की परदेशाच्या लोकाची पारख नाही आणि परदेशाच्या लोकास जाणे चाहतो परंतु पारख नसल्या कारणाने कुळ म्हणजे वाडे तसेच खेड्यांमध्येच परदेशाचा रस्ता मिळेल समजून अडत राहतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,कितीही कष्ट सहन केले तरीही परदेशास पोहचत नाही.याचप्रकारे त्रिगुणी मायेच्या करण्या साधण्यात कितीही तसदी

म्हणजे कष्ट सहन केले तरीही परममोक्षास जाऊ शकणार नाही. ।।८।।

गेल लोक की चाहिये ।। सोझी सब अे नाण ।।
जब पुंचे हंस लोक कूं ।। आ बिध के गुरू आण ।।
आ बिध के गुरू आण ।। लोक सब तोल बतावे ।।
इण बिध मोहो तोड़ाय ।। अेक पर नेछो लावे ।।
सुखराम कहे सब सांभळो ।। ग्यानी ग्यान पिछाण ।।
गेल लोक की चाहिये ।। सोझी सब अे नाण ।।९।।

परदेशी जाण्याचा रस्ता माहिती पाहिजे,त्या रस्त्यात लागणारे सर्व चिन्ह माहित पाहिजे तेव्हा तो परदेशाच्या लोकास पोहचतो.अशाप्रकारे परममोक्षाच्या रस्त्याचे सर्व चिन्ह मोजून मापून माहित पाहिजे आणि मोक्षाच्या देशाच्या आधी लागणाऱ्या सर्व लोकांमधून मोह तोडला पाहिजे आणि एकमात्र परममोक्षावर निश्चळ राहिले पाहिजे तर परममोक्षाचा देश मिळेल असे गुरु महाराज सांगतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज जतवून राहिलेत की हे ज्ञान सर्व ज्ञान्यांनो ध्यान देऊन समजा तसेच सर्व प्रकारच्या सुधबुधने समज आणून परममोक्षाचा रस्ता धरा तर परममोक्षाचे पद मिळेल. ।।९।।

निरणा को कवत्त ।।

नर के घोड़ा ऊंट ।। रथ पालखियां होई ।।
धन माया भरपूर ।। अंग सुरातन सोई ।।
पण सोजी लग जाय ।। सुण्या बिन जाय न सक्के ।।
यूं छत्ते बळ नर नार ।। मान सुख थांई थक्के ।।
सुखराम प्रख बिन चीजरे ।। सुण बदले ले ओर ।।
युं प्रमधाम मुख सूं कहे ।। पण पकड़ रहया हद ठोर ।।१०।।

मनुष्याजवळ चांगल्या रस्त्याने चालण्यासाठी घोडा आहे,रेताळ जमिनीवर चालण्या-साठी उंट आहे,मोठ्या रस्त्यांनी चालण्यासाठी रथ आहे,पहाडांवरुन चालण्यासाठी पालखी आहे,तसेच हे सर्व खर्च करण्याकरीता पैसे,चांदी,सोने,हिरे,असे भरपूर धन आहे आणि स्वभाव ही शुरवीराचा आहे आणि परदेश जाण्याकरिता निघाला आहे. परदेशाचा रस्ता पूर्ण ऐकला नाही समजला नाही या कारणाने जेथपर्यंत समजला तेथपर्यंत तो मनुष्य पोहचतो.इतका पराक्रम असतांनाही रस्ता माहित नसल्या कारणाने चालता चालता शेवटी थकून जातो आणि जेथे पोहचला तेथे सुख मानतो. याचप्रकारे साधकाजवळ मोक्ष मिळविण्याचे बळ भरपूर आहे आणि स्वभावही शुरवीर आहे परंतु मोक्षाचा रस्ता समजून घेतला नाही आणि होणकाळच्या करण्या पूर्ण बळाने आणि शुरवीरतेने तन,मन,धनापासून अंत येत नाही अशी भरपूर केली परंतु शेवटी-

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

मन,तन आणि धन थकून गेले,जेथपर्यंत समज होती तेथपर्यंत प्रयत्न केले परंतु थकल्यानंतर जेथे थकून गेला त्यालाच सुख मिळण्याचे मताने मोक्ष स्थळ समजून घेतले.यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जशी जगात वस्तूची पारख राहत नाही त्या कारणाने हंस त्या वस्तूच्या बदल्यात दुसरी वस्तू घेऊन घेतो.याप्रकारे समज नसल्या कारणाने काळापासून मुक्ती होणारा परममोक्ष नाही मिळवला त्याच्या बदल्यात काळात अटकणारी मुक्ती,मोक्ष प्राप्त केले आणि प्राप्त केलेल्या मुक्ती, मोक्षाला परमधाम तोंडाने म्हणू लागला परंतु धरलेली वस्तू होणकाळच्या हद्दीचीच आहे. ।।१०।।

हाकम ऊतर जाय ।। फेर थाणायत पलटे ।।<br>
राणी मना उतार ।। बोत खुवासां सुलटे ।।<br>
मोदी पणो वकील ।। फेर सो पटा ऊतारे ।।<br>
जिण संग देवे फोज ।। सोज तांही कूं मारे ।।<br>
छोटा मोटा जाण ।। मार सब ही सिर देवे ।।<br>
पण कंवर का सुखराम ।। गाँव कोऊ नाव न लेवे ।।११।।

राजाच्या मनातून हाकम उतरुन जातो,पोलिस उतरुन जातो.राणी उतरुन जाते, राणीच्या जागी दासी राणी बनून जाते.राजा मोदीचा मोदीपणा उतरुन देतो,वकीलाची वकीली उतरुन देतो.ज्याच्यासोबत युध्द करण्याकरीता फौज देतो त्याची चूक मिळाली तर त्याला शोधून मार देतो याच प्रकारे लहान–मोठ्या माराला हाकम पोलिस, राणी, मोदी,वकिल,इ. सर्वांना देतो परंतु त्याच्यापासून जन्मलेला राजकुमार राज गादीवरुन कधी उतरवत नाही ना राजकुमार राजगादी वरुन उतरवून द्या असे कोणीही त्याच्या राज्यातील मोठ्याहून मोठा अधिकारीही ही गोष्ट सांगू शकत नाही.अशाप्रकारे सतस्वरुप त्रिगुणी मायेच्या करणी क्रिया करणाऱ्यांना सुखाच्या करणीच्या फळांपासून उतरवून काळाच्या दु:खात टाकून देतो परंतु सतस्वरुप संताला आनंदी झाल्यावर ना कोणत्या करणीचे फळ देतो ना नाराज झाल्यावर कोणते काळाच्या मुखाचे फळ देतो.त्याला आपले सतस्वरुपाचे पद देतो.।११।

हाकम पावे रीझ ।। गढ को धणी न होई ।।<br>
बड़ा पटायत जाण ।। तक्त कूं लेहे न कोई ।।<br>
नाजर खुवासां लोक ।। ओर राणी बोहो कुवावे ।।<br>
माया करो बिलासा ।। राज सपने नही पावे ।।<br>
आज काल दिन पांच मे ।। ने:छे सरस बखाण ।।<br>
सब ही सिर सुखराम क्हे ।। कंवर भूप हुवे आण ।।१२।।

जसे राजा हाकमला चुकी केल्यावर हाकम पदावरुन उतरवून देतो तसेच हाकमपद चांगले चालविल्याने बक्षिसही देतो परंतु गडाचे धणी पद देत नाही.याचप्रकारे कितीही राजाच्या मर्जीचा मोंठा पटायत राहो त्याला त्याच्या कामाच्यानुसार फळ मिळते परंतु राज्य सिंहासन मिळत नाही.नाझर,खुवासा,अनेक राण्या हे सर्व मायेचे सुख घेतात परंतु हे कोणीही राजपद स्वप्नात ही मिळवत नाही परंतु आजकाल पाच दिवसात म्हणजे कधीही राजाचा राजपुत्रः–म्हणजे पुत्र सर्वांच्या शिरावरचे पद म्हणजे सर्वांहून सरस पद म्हणजे राजापद प्राप्त करुन सर्वांचा राजा बनतो.असेच सतस्वरुपाचा हंस आजकाल म्हणजे थोड्याच दिवसात होणकाळातील शरीर सोडतो आणि सतस्वरुपाचे विज्ञानीपद धारण करतो. ।।१२।।

साखी ।।

कंवर रहे सुखराम कहे ।। गढ ऊपर दिन रात ।।
खाणो पीणो मेल मे ।। वे सुख संया साथ ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात राजाचा कुवर गडावर दिवसरात्र राहतो. त्याचे खाणे,पिणे,सर्व राज महालात होते आणि तेथे युवराज्ञींच्या सोबत सुख सैयेचे सुख घेतो. ।।१।।

ज्यां राजा का मेहेल हे ।। कंवर बिराजे मांय ।।
हाकम सुण सुखराम के ।। वां लग कदे न जाय ।।२।।

हा राजपुत्र जेथे राजाचा महाल आहे त्यात विराजलेला राहतो.अशा राजाच्या महालात कितीही मर्जीचा हाकम राहो तो त्या महालात कधी नाही जाऊ शकत. ।।२।।

बड़ा पटायत सूरवाँ ।। तां जुग म्हेमा होय ।।
सपने ही सुखराम के ।। तक्त न बेसे जोय ।।३।।

मोठा जहागिरदार शुरवीरांची राजाच्या पूर्ण राज्यात तसेच राज्याच्या बाहेरही महिमा होते परंतु असे मोठे जहागिरदार शुरवीर राज्य सिंहासनावर स्वप्नातही बसत नाही. अशाप्रकारे मायेच्या करण्या जहागिरदारांची होणकाळात खूप महिमा होते परंतु त्यांना सतस्वरुप पद स्वप्नातही मिळत नाही. ।।३।।

कवत ।।

हाकम सुर अवतार ।। देव थाणायत जाणो ।।
रिष मुनि अमराव ।। सिद्ध फिर पीर बखाणो ।।
गावे सब्द रसाळ ।। भक्त सुरगुण सो होई ।।
ऐ सब नाजर कुवास ।। आन जाणो सब लोई ।।
निर्गुण ब्रम्ह उपास ।। राम रट गिगन समाया ।।
से साधु सुखराम ।। भूप राणी सूत जाया ।।१३।।

जसे राजाच्या जवळ हाकम आहे तसे सतस्वरुप राजाजवळ ३३ कोटी देवता,इंद्र तसेच अवतार हे हाकम राहतात.ब्रम्हा,विष्णु,महादेव हे ठाणेदार राहतात.मायेचे गोड्पद गाणारे कमी जास्त सगुण भक्त हे सर्व सतस्वरुप राजाचे नाजर,खुवास आहे आणि या सर्वांना सोडून अन्य सर्व जसे राजाच्या जवळ प्रजा आहे तसे लोक आहे आणि जो सतस्वरुप निर्गुण ब्रम्हची राम रटण्याची उपासना करुन दहाव्याद्वारात गगनात चढून गेले आहे ते सतस्वरुपी साधू राजा–राणीपासून जन्मलेल्या राजपुत्रासारखे आहेत. ।।१३।।

हाकम संग दे फोज ।। फेर थाणे सिर मेले ।।
जो मोटा अमराव ।। जाण तांही संग पेले ।।
दूजा सरस वकील ।। तांही संग फोजा दीवी ।।
मोदी खवास बखाण ।। ओर राण्या संग लीवी ।।
रीज मोज सब देत हे ।। सरस निरस सब जाण ।।
पण कंवरां कूं सुखराम कहे ।। जड़े गढ़ मे आण ।।१४।।

जसे राजा हाकमच्या सोबत फौज देऊन युध्दात पाठवतो.वेळ आली तर ठाणेदाराला ही फौज घेऊन युध्दात पाठवतो.मोठे उमराव,सरस वकिल या सर्वांना युध्दात फौज देऊन पाठवतो.राजा युध्दात आपल्या सोबत मोदी खाण्या–पिण्याच्या सामानाच्या पूर्ततेसाठी फौजेच्या सोबत घेऊन घेतो.खुवास म्हणजे राजाच्या चाकरीत राहणाऱ्यांना तसेच राण्यांना राजा युध्दात सोबत घेऊन जातो आणि युध्दात ज्याने जसे यश मिळवले तसे कमी जास्त बक्षिस सर्वांना देतो.राजा राजपुत्राला गडावर सुरक्षितपणे ठेवतो.त्याला युध्दावर कधी घेऊन जात नाही.अशा प्रकारे ३३ कोटी देवता,इंद्र, अवतार,ब्रम्हा,विष्णू,महादेव, सगुण भक्तीवाल्याना होणकाळचे वेगवेगळे पद मिळते आणि त्या पदाचे सुख हे देवता,इंद्र, अवतार,ब्रम्हा,विष्णु,महादेव हे सर्व भोगतात परंतु यांच्यातून कोणीही सतस्वरुप पदात जात नाही.सतस्वरुपी संत प्रालब्ध भोगत होणकाळात राहतो तो पर्यंत तो या एकाही पदाचे सुख घेत नाही.तो सतस्वरुपाच्या विधीने शरीराचे खंड–ब्रम्हंड बनवून दहाव्याद्वाराच्या गडावर राहतो आणि शरीर सुटल्यावर सतस्वरुप पदास जातो. ।।१४।।

सवयो ।।

हाळी सुण चोधरी को डरे नही गांव ही सुं ।।
पटायत को कुवास वान पटेली सो कुन हे ।।
चेला सुण राजाजी का छिन अमराव कहे ।।
पातस्या को अेधी सोतो भुप कुं न मान हे ।।

काजी सो कुरान पढ पातस्या कूं रद्द करे ।।
मुल्ला सो पुकार बांग कुराण नही मान हे ।।
के सुखराम साधु रामजी का बेटा बेटी ।।
आन देव सब ही कूं अेसी बिध जाण हे ।।१५।।

जसे गावाच्या पाटलाचा नोकर गाववाल्यांशी भित नाही.जहागिरदाराच्या चाकरीत राहणारा मनुष्य पाटील म्हणजे सरपंचाला भीत नाही आणि राजाचा उमराव जहागिरदाराला काहीही समजत नाही आणि बादशहाचा दूत स्वत: राजाला ही मानत नाही.मुसलमानाचा काजी कुराण वाचून बादशहाची बादशाही रद्द करतो.मुल्ला बांग(अज्या)देवून ज्या कुराणाने बादशहाची बादशाही रद्द केली त्याच कुराणच्या तत्वाला रद्द करतो.बांग देणे हे कुराणाच्या तत्वाच्या विरुध्दात आहे.याचप्रकारे सतस्वरुपाचे संत जो राजाच्या पुत्र पुत्री समान आहे ते आनदेव म्हणजे सतस्वरुप देव सोडून सर्व होणकाळपद,मायापद तसेच होणकाळ आणि मायेपासून निपजलेले पुण्य कर्ते दैविक देवता ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती, अवतार तसेच पापकर्ते राक्षसी देवी-देवता भैरु,क्षेत्रपाळ,कालिका,दुर्गा,सितला इत्यादीना मानत नाही. ।।१५।।

।। इति बिन निर्णा को अंग संपूरण ।।